# भारतीय राज्यघटना व ५० टक्के आरक्षणाची मर्यादा

**अरुण दामोदर नलवडे,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना :**

राज्यघटनेच्या काही तरतुदी आरक्षणाची व्यवस्था करतात; पण त्यासाठी ठरावीक अटीही घातल्या गेलेल्या आहेत. इतर तरतुदीबरोबरच घटनेचे कलम १५ आणि कलम १६ हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे. ही दोन्ही कलमे घटनेच्या तिसऱ्या प्रकरणात म्हणजे मूलभूत हक्कात येतात. प्रत्येक कायदा नागरिकांना एकमेकांच्या विरुद्ध किंवा समाजाच्या विरुद्ध अधिकार देत असतो; परंतु मूलभूत हक्क हे नागरिकांचे किंवा व्यक्तींचे असे हक्क आहेत, की जे, संसदेलाही काढून घेता येणार नाहीत. मूलभूत हक्कांवर गदा आणणारा कायदा संसदेने केल्यास तो देखील घटनाबाह्य असल्याचे न्यायालय सांगू शकतात. घटनेच्या कलम १५ पोटकलम ४ मध्ये अशी व्यवस्था केलेली आहे की, जर कुणी एक समाज घटक हा सामाजिकदृष्ट्या किंवा शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला असेल किंवा अनुसुचित जाती मागासवर्गीय, किंवा अदिवासी असेल तर त्यांच्यासाठी विशेष आरक्षण दिले जाऊ शकेल. या वेळी ५० टक्के आरक्षण मर्यादेचा प्रश्न इंद्रा सोहनी केस मुळे आला आणि आज भारतात आरक्षण विषयक विविध जाती जमातीच्या मागण्या शासनाकडे वाढत चालल्या आहेत. त्यावेळी मराठा आरक्षण बाबत न्यायालयाने ५० टक्के आरक्षणच मर्यादेचा मुद्दा पुढे आला आहे.

**राज्यघटना व आरक्षण**

- १९९५ ची ७७ वी घटनात्मक दुरुस्तीमध्ये इंद्र सहानीच्या केसमधील निर्णय घेण्यात आला की केवळ सुरुवातीच्या नियुक्त्यांमध्येच आरक्षण असेल, पदोन्नतीमध्ये आरक्षण नाही. तथापि, घटनेच्या कलम १६ (ए) नुसार अनुसूचित जाती / जमातीतील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीमध्ये आरक्षणाच्या तरतुदी करण्याचा अधिकार राज्यास आहे, जर राज्याने त्यातील अनुसूचित जाती / जमातीतील जमातींचा विचार केला तर राज्य जाती / अनुसूचित जमाती अंतर्गत असलेल्या सेवांचे पुरेसे प्रतिनिधित्व केले जात नाही.
- २००० सालची ८१ वी घटनात्मक दुरुस्तीमध्ये १६ (४ब) आणला ज्यानुसार अनुसूचित जाती / जमातीच्या विशिष्ट वर्षातील रिक्त जागा त्यानंतरच्या वर्षी भरण्यासाठी ठेवल्या जातील आणि नियमित रिक्त जागांमध्ये त्यांचा समावेश केला जाणार नाही. त्या वर्षी. जाईल थोडक्यात याने अनुशेष रिक्त जागांमधील आरक्षणाची ५० % मर्यादा रद्द केली आहे.
- २००१ ची ८५ वी घटनात्मक दुरुस्ती कायदा २००१ मध्ये अनुसूचित जाती व जमातीतील सरकारी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना आरक्षणासाठी 'परिणामी ज्येष्ठता' मिळण्याची तरतूद आहे, ही अंमलबजावणी १९९५ च्या अगोदरपासून करण्यात आली.

याचा बरोबर संविधानात १०१ वी, १०३, वी,१०४ वी घटनादुरुस्ती ज्यामध्यमातून आरक्षण बाबत वेगवेगळ्या तरतुदी करण्यात आल्या. यात १०३ वी घटनादुरुस्तीनुसार आर्थिक दुर्बल घटकाला १०% आरक्षण दिले गेले.

**१९९२ चा इंदिरा सहानी खटला व ५० % मर्यादा :**

१९२० पासून तामिळनाडूमध्ये आरक्षण आहे. १९५१ मध्ये राज्यघटनेत दुरूस्ती करून आरक्षणाची तरतूद केली गेली. ज्या मंडल आयोगाच्या शिफारशीनंतर ओबीसींना २७ टक्के आरक्षण लागू केलं गेलं होतं, त्याच्या आधीपासून म्हणजेच १९९० च्या आधीपासून तामिळनाडूत ६० टक्के आरक्षण होतं. सुप्रीम कोर्टाने १९९२ सालच्या इंदिरा साहनी प्रकरणात आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवर आणली होती. ज्यावेळी विश्वानाथ प्रताप सिंग सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशी मान्य करत इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) २७ टक्के आरक्षणाची घोषणा केली. या शिफारशींच्या वैधतेला दिल्लीस्थित वकील इंद्रा साहनी यांनी १ ऑक्टोबर १९९० रोजी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. या याचिकेवर १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ६ विरुद्ध ३ असा निकाल दिला. आरक्षणाचे एकूण प्रमाण ५० टक्क्यांच्या वर जाता कामा नये, असा निर्णय सहा न्यायमूर्तींनी दिला. असाधारण परिस्थितींमध्येच ते ५० टक्क्यांच्या वर जाऊ शकते असे या वेळी नमूद करण्यात आले. त्याचबरोबर सामाजिक आणि शैक्षणिक आधारांवरच आरक्षण मिळू शकते. केवळ गरीब आहे म्हणून आरक्षण मिळू शकत नाही असे नमूद करीत खुल्या वर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी दिलेले आरक्षण न्यायालयाने रद्द केले. ५० टक्क्यांची मर्यादाच का हे न्यायालयाने निकालात स्पष्ट केलेले नाही. समान संधी मिळावी म्हणून आरक्षण दिले जाऊ शकते. असे असले तरी आरक्षणाचा वापर न्याय्य पद्धतीने आणि वाजवी मर्यादांमध्येच केला गेला पाहिजे असे न्यायालयाने स्पष्ट केले होते. या निर्णयामध्ये 'मलई थर' या संकल्पनेलाही महत्त्व देण्यात आले आणि मागासवर्गीयांसाठी आरंभिक नेमणुका केवळ मर्यादित असाव्यात व पदोन्नतीमध्ये आरक्षण नको, अशी तरतूद करण्यात आली. पूर्वी आरक्षण केवळ अनुसूचित जाती व जमातींसाठी होते. इतर मागासवर्गीय (ओबीसी) मंडल आयोगाने आरक्षित प्रवर्गात आणले.

राज्यघटनेच्या कलम १४ मध्ये समानतेचा मूलभूत अधिकार देण्यात आला आहे. तर कलम १५(४) आणि १६(४) नुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास नागरिकांसाठी विशिष्ट व्यवस्था असावी, असे सूचित करण्यात आले आहे. थोडक्यात अशा

घटकांसाठी आरक्षणाची तरतूद ही समानतेला अपवाद म्हणून करण्यात आली आहे. परंतु आरक्षण प्रकरणात अपवाद हा कधीही नियमापेक्षा म्हणजेच समानतेच्या मूलभूत अधिकारापेक्षा मोठा असू शकत नाही. त्यामुळेच ५० टक्क्यांच्या वर आरक्षण देता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले होते. शिवाय आरक्षणाची टक्केवारी केंद्र वा राज्य सरकारने ५०च्या वर नेली तर ती कमी केली जाईल, असेही नमूद केले होते.

**१०२ वी घटनादुरुस्ती आणि आरक्षण मर्यादा :**

१०२व्या घटनादुरुस्तीनंतर राज्याला अधिकार नसताना आरक्षणाचा वेगळा प्रवर्ग तयार करणे आणि घटनेतील तरतुदींचे उल्लंघन करून स्वतंत्र आरक्षण प्रवर्ग तयार करणे हे मुद्दे मराठा आरक्षणाच्या निमित्ताने उपस्थित झाले होते. मात्र मराठा आरक्षण रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने १०२ वी घटनादुरुस्तीही वैध ठरवली. या घटनादुरुस्तीने घटनेच्या मूळ गाभ्याला कोणताही धक्का लागलेला नाही वा त्याचे उल्लंघन झालेले नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. इंद्रा साहनी प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय मागास प्रवर्ग आयोगाची स्थापना १४ ऑगस्ट १९९३ रोजी करण्यात आली. एखाद्या सामाजिक गटाचा समावेश करण्याबाबतची प्रकरणे या आयोगाकडून हाताळली जायची, तर या प्रवर्गाच्या हक्कांशी तसेच भेदभावाशी संबंधित तक्रारींबाबत कार्यवाहीचे अधिकार राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडे होते. १ ऑगस्ट २०१८ रोजी झालेल्या १०२व्या घटनाददुरुस्तीने हे दोन्ही अधिकार व कार्ये राष्ट्रीय मागास प्रवर्ग आयोगाकडे सोपवण्यात आली. या घटनादुरुस्तीने राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा दिला. या घटनादुरुस्तीमध्ये अनुच्छेद ३३८ (ब) चा समावेश करण्यात आला. त्यानुसार राष्ट्रीय मागासवर्ग आयोग स्थापन करण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला. तर अनुच्छेद ३४२ (अ) नुसार, सामाजिक आणि आर्थिक मागास प्रवर्गात कोणत्या समाजाचा समावेश करायचा याचा अधिकार राष्ट्रपती आणि संसदेला देण्यात आला. असे असले तरी घटनेच्या अनुच्छेद १५ आणि १६ नुसार हे अधिकार राज्यांना आहेत.

**५० आरक्षण मर्यादा पार करणारे राज्य :**

राज्यांचा विचार केला तर सर्वात जास्त आरक्षण हरियाणामध्ये दिले जाते. हरियाणात एकूण ७० टक्के आरक्षण देण्यात येत आहे. तर तामिळनाडूत ६० आणि झारखंडमध्ये ६०० टक्के आरक्षण दिले जाते. राजस्थानात ५४ तर पश्चिम बंगालमध्ये २५ टक्के आरक्षण दिले जाते. उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेशात प्रत्येकी ५० टक्के आरक्षण दिले जाते. पूर्वेकडील राज्यांचा विचार करता अरुणाचल प्रदेश, मेघालय, नागालँड आणि मिझोराममध्ये प्रत्येकी ८० टक्के आरक्षण दिलेजाते.आंध्र प्रदेशच्या राज्यपालांनी (तेलंगणासह) अनुसूचित जमाती (एसटी) उमेदवारांना अनुसूचित भागातील शालेय शिक्षकांच्या पदांवर १००% आरक्षणाची घोषणा केली. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने ते घटनाबाह्य घोषित केले.

**समीक्षा:**

भारतीय राज्यघटना व ५० टक्केची आरक्षण मर्यादा बाबत १९९२ च्या निकालाचा आढावा बदलत्या परीस्थीती नुसार घेतला जावा यामध्ये जातींची आकडेवारी योग्य पद्धतीने पुढे यावी. तसेच आरक्षणाचा निर्णय घेताना, विविध समुदाय आरक्षणाची तरतूद करणारी राज्य सरकारे संघीय रचनेचे अनुसरण करीत आहेत की ती नष्ट करीत आहेत हेदेखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कारण कलम ३४१ आणि कलम ३४२ नुसार संसदेस विशिष्ट समुदायाला अनुसूचित जाती (अनुसूचित जाती-अनुसूचित जाती) किंवा अनुसूचित जमाती (एसटी) म्हणून सूचित करण्याचा अधिकार आहे.याच बरोबर पत्येक राज्यांनी आरक्षण आणि गुणवत्ता यांच्यात समतोल राखून या प्रश्नाची सोडवणूक भावनिक नाहीत तर व्यवहारिकपणे कारवाई.

**संदर्भ सूची:**

१.दैनिक लोकसत्ता वृत्तमान पत्र

२. दैनिक सकाळ वृत्तमान पत्र

३ दैनिक महाराष्ट्र टाईम्स वृत्तमान पत्र

४..बीबीसी हिंदी वेब पोर्टल

५.www.deustiias.in